दिनांक :     .9.2019

**प्रति,**

**मा. राज्यपाल,**

**आंध्रप्रदेश.**

**विषय : आंध्रप्रदेश सरकारकडून केवळ हिंदूंच्या मंदिरांविषयी विविध प्रकारे होत असलेल्या धार्मिक आक्रमणांवर योग्य ती कृती करण्याविषयी.....**

महोदय,

आंध्रप्रदेशमध्ये जगनमोहन रेड्डी यांचे सरकार येऊन काही मासच झाले; मात्र सत्ता येताच त्यांच्याकडून हिंदुविरोधी कारवायांना प्रारंभ झाला आहे. अनेक हिंदुविरोधी कायदे बनवले जात आहेत आणि उघडपणे ख्रिस्ती धर्माचा प्रचार चालू करण्यात आला आहे. मंदिरांचे धन अन्य पंथियांना दिले जात आहे. मंदिरांच्या भूमी अवैधपणे विक्री केल्या जात आहेत, तसेच मंदिरांच्या परिसरांमध्ये अन्य पंथियांना व्यवसाय करण्याची अनुमती दिली जात आहे.

*** तरी या संदर्भात चालू असलेल्या काही घडामोडी आम्ही आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो**

1. आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांचे वडील सॅम्युअल राजशेखर रेड्डी हे कट्टर ख्रिस्ती होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात उघडपणे ख्रिश्चन पंथांचा प्रसार करण्यासाठी सत्तेचा दुरुपयोग केला होता. उदा. तिरुमला तिरुपती येथील काही टेकड्या ख्रिस्त्यांना दिल्या. तिरुपती मंदिराचे लाडू बनवण्याचे कंत्राट हे ख्रिश्चन व्यक्तीला दिले. ख्रिश्चन व्यक्तीला देवस्थानचे विश्वस्त केले, तिरुपती देवस्थान संचालित शाळांमधील हिंदू देवतांची चित्रे काढून येशूची चित्रे लावण्यात आली. या सर्व प्रकारांमुळे हिंदूंमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. सॅम्युअल राजशेखर रेड्डी यांचे पुत्र जगमोहन रेड्डी हे देखील त्यांच्या वडीलांच्या मार्गाने हिंदूविरोधी राज्यकारभार करत आहेत.

2. आंध्रप्रदेशचे ख्रिस्ती मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी 25 लाख लोकांना घरे बांधून देण्याची घोषणा केली होती. याविषयीच्या योजनेसाठी त्यांनी मंदिरांची भूमी काही वर्षांच्या भाडेतत्त्वावर (लिजवर) मागितली होती. यासाठी त्यांनी नोटीस जारी करून प्रत्येक जिल्ह्यातील मंदिरांच्या भूमीची माहिती घेण्यास प्रशासनाला सांगितले होते. मुख्य सचिवांच्या माध्यमातून सर्व जिल्ह्याधिकार्यांना याविषयी नोटीस पाठवण्यात आली आहे. वास्तविक सरकारी योजनांसाठी मंदिरांच्या भूमीचा वापर करणे चुकीचे आहे, असा आदेश वर्ष 2006 मध्ये हैदराबाद उच्च न्यायालयाने दिला होता, असे असतांना नियम धाब्यावर बसवून मंदिरांची जागा ताब्यात घेणे चुकीचे आहे.

हिंदु जनजागृती समितीने राज्यशासनाला पत्र लिहून ही गोष्ट लक्षात आणून दिल्यावर शासकीय अधिकाऱ्यांनी हिंदूंच्या मंदिरांच्या मालकीच्या जागा असलेली घरे आणि इतर व्यावसायिक दुकाने बांधण्यासाठी बलपूर्वक कह्यात घेऊ नये, असा सुधारित आदेश 30 ऑगस्ट 2019 या दिवशी दिला. ख्रिस्ती मुख्यमंत्री असलेल्या रेड्डी यांनी चर्च किंवा मशीद यांची भूमी भाडेतत्त्वावर घेण्याचा आदेश का दिला नाही ? यावरून त्यांचा हिंदुद्वेष दिसून येतो !

3. आंध्रप्रदेश रस्ते परिवहन महामंडळाने (आंध्रप्रदेश रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन) तिरुमला येथे जाण्यासाठी देण्यात येणाऱ्या बसच्या तिकीटामागे हज आणि जेरुसलेम यांचे विज्ञापन छापले होते. हे विज्ञापन सरकारच्या अल्पसंख्यांक विभागाद्वारे छापण्यात आले होते. या प्रकरणी स्थानिक हिंदुत्ववाद्यांनी विरोध केल्यानंतर ती तिकीटे रहित करण्यात आली. तसेच अशाप्रकारची विज्ञापने छापलेली तिकीटे वितरित कशी झाली ?, याचा तपास करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. महत्त्वाचे म्हणजे तिरुमला क्षेत्रात अन्य पंथियांना प्रचार करण्यास कोणत्याही प्रकारची अनुमती नाही. असे असतांना बसच्या तिकिटावर अन्य पंथियांच्या प्रार्थनास्थळांचे विज्ञापन छापले जाणे, हे गुन्हा केल्यासारखेच आहे.

4. 'ज्या कर्मचाऱ्यांनी हिंदु धर्म सोडून अन्य धर्म स्वीकारला आहे, त्यांनी नोकरी सोडावी', असा आदेश आंध्रप्रदेश सरकारने श्री तिरुमला तिरुपति देवस्थानच्या कर्मचाऱ्यांना दिला आहे. तिरुपती देवस्थानमध्ये एकूण 48 बिगर हिंदु अधिकारी आणि कर्मचारी आहेत. यातून असे दिसून येते की, मंदिर सरकारीकरण केल्यानंतर अहिंदूंनाही तेथील मंदिरांमध्ये कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. अशाने हिंदूंच्या मंदिरांचे पावित्र्य कसे टिकेल ? सरकारने अन्य पंथियांच्या प्रार्थनास्थळांमध्ये

हिंदूंची नेमणूक केल्याचे कधी ऐकले आहे का ? जर तिरुमला तिरुपती देवस्थानमध्ये अशाप्रकारे अहिंदूंची नेमणूक झाली असेल, तर त्या राज्यातील अन्य सरकारीकरण झालेल्या मंदिरांमध्येही सरकारने वरील आदेशाची अंमलबजावणी करायला हवी.

5. आंध्रप्रदेश सरकारच्या अल्पसंख्यांक कल्याण मंत्रालयाच्या सचिवांनी 27 ऑगस्ट या दिवशी काढलेल्या एका आदेशात म्हटले आहे की, मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांच्या वाय.एस्.आर्. काँग्रेस पक्षाच्या निवडणूक घोषणापत्रात राज्यातील चर्चच्या पाद्र्यांना मासिक 5 सहस्र रुपये मानधन देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. अशाप्रकारे पाद्र्यांना मानधन देऊन सरकार राज्यघटना आणि त्यातील समानता या दोन्ही सूत्रांचा अवमान करत आहे.

समाजातील सर्व घटकांना सर्व सुविधा समानतेने मिळायला हव्यात. धर्म, जात, पंथ, वर्ण, भाषा आदींनुसार सुविधा देणे, हे भेदभाव करण्यासारखेच होईल. लोकशाही मार्गाने चालणाऱ्या आपल्या देशाने धर्मनिरपेक्ष व्यवस्था अंगिकारली आहे. या शब्दातूनच आपली व्यवस्था ही कोणत्याही धार्मिक विचारसरणीवर आधारित नाही. असे असतांना आंध्रप्रदेशसारख्या राज्यात अनेक निर्णय हे एका विशिष्ट धर्माच्या लोकांना सोयीचे व्हावेत, या दृष्टीने घेतले जातात, हे दुर्दैवी आणि अत्यंत चुकीचे आहे.

6. अशा निर्णयामुळे देशाच्या घटनात्मक ढाचाला बाधा तर पोहोचतेच, तसेच हिंदूंच्या मनातही राज्यकर्ते केवळ अन्य धर्मियांच्या धर्मभावना जपतात आणि हिंदूंच्या बाबत धर्मनिरपेक्षता पाळतात, असा नकारात्मक संदेश जातो आणि तो देशाच्या एकात्मतेसाठी धोकायदायक आहे.

**⁕ तरी या प्रकरणी आम्ही पुढील मागण्या करत आहोत....**

1. आंध्रप्रदेशात किती मंदिरांमध्ये अहिंदू किती कालावधीपासून काम करतात ?, त्यांना इतके दिवस कामावर का ठेवण्यात आले ?, तसेच हा निर्णय आतापर्यंत ज्यांनी घेतला त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी.

2. धर्मांतरित ख्रिस्ती असलेल्या लोकांना तिरुपती देवस्थानमध्ये नोकरी देण्याचा निर्णय घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. त्याप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याची ते हिंदु आहेत कि नाहीत, याची चौकशी करण्यात यावी आणि मगच त्यांना कामावर ठेवण्यात यावे. अन्य मंदिरांमध्ये असे झाले असेल, तर तेथेही कारवाई करण्यात यावी.

3. हिंदूंच्या मंदिरांची भूमी ताब्यात घेऊन त्यावर गृहनिर्माण प्रकल्प उभारण्याचा निर्णय तत्काळ रहित करावा, तसेच हैदराबाद उच्च न्यायालयाचा आदेश असतांना नियम धाब्यावर बसवून मंदिरांची जागा ताब्यात घेण्याचा निर्णय घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी.

4. आंध्रप्रदेशात ख्रिस्ती मुख्यमंत्री असल्याने हिंदूंच्या मंदिरांच्या अर्पणपेटीवर डल्ला मारण्यासह त्यांच्या भूमी हडप करण्याचा प्रकार होत आहे. तरी वरील सर्व बाबी लक्षात घेता तेथील जगनमोहन रेड्डी सरकार विसर्जित करावे.

प्रत : आपला विश्वासू,

1. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी,
भारत सरकार, नवी देहली.

2. मा. केंद्रीय गृहमंत्री,
भारत सरकार, नवी देहली.

संपर्क :